दै. पुढारी दि. 03/11/2022

दै. पुढारी दि. 03/11/2022



(छाया : करणसिंह बैस)

# २२ लाखांच्या चोरीतील चोरटे २४ तासांत गजाआड

## स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी

**नांदेड, पुढारी वृत्तसेवा :** प्रसिद्ध कंत्राटदार सतीश माहेश्वरी यांच्या सन्मान प्रिस्टीज येथील कार्यालयातून रविवारी एका चोरट्यांनी २२ लाख रुपयांची रकम चोरून नेली होती. या घटनेतील दोन्ही चोरट्यांना पकडण्यात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला यश आले आहे. चोरट्यांकडून १७ लाख ४१ हजार ४०० रुपये जप्त करण्यात आले असल्याची माहिती पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली.

चोरीची घटना सीसीटीव्हीमध्ये कैदझालीहोती. याफुटेजचीवेगवेगळ्या अँगलने पाहणी करून पोलिस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांनी दोन पथके चोरट्याच्या शोधासाठी पाठविली होती. चिखलीकरांना हे चोरटे मुदखेड येथे लपून बसल्याची माहिती खबऱ्याने दिल्यानंतर त्यांनी एक पथक तिकडे पाठविले. रेल्वेस्टेशन परिसरातून शिवदास पुरभाजी सोनटक्के आणि अंकुश पांडुरंग मोगले या दोघांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिली. तसेच सोनटक्के याच्याकडून १३ लाख ४१ हजार ४०० आणि अंकुश मोगले याच्याकडून ४ लाख रुपये रोख पोलिसांनी जप्त केले आहेत. दोन्ही चोरट्यांना पुढील तपासासाठी वजिराबाद पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

ही कामगिरी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांच्या नेतृत्वाखाली सपोनि पांडुरंग माने, दत्तात्रय काळे, आशिष बोराटे, जसवंतसिंघ शाहू, संजय केंद्रे, शंकर म्हैसनवाड, अफजल पठाण, विठ्ठल शेळके, तानाजी येळगे, गणेश धुमाळ आदींनी केली.